

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**********************************************************

**सूचना** **दि. 26 / 07 / 2019**

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग - II च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, शनिवार दिनांक 27/07/2019 रोजी इतिहास पेपर क्रमांक – IV "आधुनिक भारताची जडणघडण " या विषयाच्या प्रकरण-2 (1857 चा उठाव ) वरील ओपनबुक टेस्ट चे आयोजन चौथ्या तासाला रूम नंबर 11 मध्ये सकाळी 10 ते 10.45 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

इतिहास विभाग



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

********************************************************

**प्रश्नपत्रिका** दि. 27 / 07 / 2019

बी. ए. भाग - II

सेमिस्टर - III पेपर क्रमांक - IV

विषय - "आधुनिक भारताची जडणघडण"

प्रकरण-2 1857 चा उठाव

ओपन बुक टेस्ट वेळ - सकाळी 10 ते 10.45

प्रश्न - 1857 च्या उठावाच्या आपयाशाची कारणे स्पष्ट करा . (गुण-10)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि. 27/ 7/ 2019

---

वर्ग - बी.ए.- II सेमिस्टर - III

पेपर क्र - IV टेस्ट - ओपन बुक टेस्ट

प्रकरणाचे नाव - आधुनिक भारताचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S256 | 7 | 10 | | |
| 2 | S139 | 7 | 11 | | |
| 3 | S187 | 7 | 12 | | |
| 4 | S096 | 10 | 13 | | |
| 5 | S138 | 7 | 14 | | |
| 6 | | | 15 | | |
| 7 | | | 16 | | |
| 8 | | | 17 | | |
| 9 | | | 18 | | |

विषय शिक्षक स्वाक्षरी

10/10

Page No.
Date 27.2/2019

Name - kajal Parashram kamble.
class - B.A. II , Roll No - 5096
Sub - History.
Assignment Name - १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कारणे.

प्रश्न - १८५७ च्या उठावाच्या अपयशाची कारणे.

→ १८५७ च्या उठावाला प्रारंभीच्या तीन - चार महिन्यांत बऱ्यापैकी यश मिळाले. परंतु इंग्रजांनी स्वतःला सावरले. प्रचंड सैन्य, युद्धसाहित्य व असामान्य नेतृत्व यांच्या सहाय्याने इंग्रजांनी १८५७ चा उठाव यशस्वीपणे दडपुण टाकला. क्रांतिकारकांनी सुद्धा आपल्या प्राणाची पर्वा न करता निकराचा निर्धारपूर्वक लढा दिला. परंतु क्रांतिकारकांना अपयश आले. त्या अपयशाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) उठावाचे मर्यादित क्षेत्र :

१८५७ चा उठाव देशव्यापी होऊ शकला नाही. देशाच्या काही भागापुरता उठाव मर्यादित राहिला. देशातील १/६ भूभागातच फक्त उठाव झाला. १/१० जनताच सहभागी झाली. दक्षिण भारत शांत होता. क्रांतीभागोदर आठ वर्षे खालसा केलेला पंजाब शांत होता. पतियाळा, नाभा इत्यादी शीख स्थानिकांनी तटस्थ न राहता उलट इंग्रजांना मदत केली. पंजाब मधील शीख इंग्रजनिष्ठ राहिले. मध्य व पूर्व बंगाल शांत राहिला होता. पंजाब, सिंध, राजस्थान, काश्मीर, नेपाळ, महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, गुजरात इत्यादी भागांत उठाव नव्हता. त्यातील काही भागात किरकोळ स्वरूपाचा उठाव झाला. पंजाबी, शीख, गुरखे, निजाम इत्यादींनी इंग्रजांनाच पाठिंबा दिला. थोडक्यात, उठावाचे स्वरूप मर्यादित क्षेत्रापुरतेच राहिल्याने हा उठाव इंग्रजांना दडपून टाकता आला.

(२) लोकक्रांती नव्हती :-

सर्व लोकांनी फक्त येऊन लोक उठाव किंवा लोकक्रांती घडून आली नाही. ज्यांच्या जमिनी,

सुरुवात केली. ते जमीनदार, सावकार व कंत्राटदार यांच्याकडे वळले व त्यांनी त्यांच्यापासून मिळकती हिसकावण्यास सुरुवात केली. बंडखोरांनी केलेली लुटालूट, जाळपोळ व कत्तली इत्यादी प्रकार पाहून वरिष्ठ वर्गाला बंडाच्या अपयशापेक्षा विजयाची भीती जास्त वाटू लागली होती. कानपूरच्या लुटीत वाटणीसाठी आपापसात भांडणे सुरु झाली.

(९) समान ध्येयाचा अभाव :-

१८५७ च्या उठावातील बंडवाल्यांसमोर इंग्रजांचा पराभव करून त्यांची राजवट नष्ट करण्याचे ध्येय होते. परंतु प्रत्येकाचे ध्येय वेगवेगळे होते. हिंदी शिपायांना स्वतःची अनेक गाऱ्हाणी व दुःखे दूर करावयाची होती. संस्थानिक व जमीनदारांना आपल्या गेलेल्या सवलती परत मिळवावयाच्या होत्या तर समग्र जनता दारिद्र्य व शोषणामुळे गांजली होती. उठावात भाग घेणाऱ्या विविध लोकांना आपआपले स्वार्थ साधावयाचे होते. म्हणूनच जॉन स्ट्रेची म्हणतो, "राष्ट्रीयत्वाच्या अभावी स्वातंत्र्यसंग्रामात जरी बंडखोरांना यश लाभले असते तरी शासनसंस्था चालविण्यासाठी लागणारी राष्ट्रीयतेची प्रेरणा भारतीयांत नव्हती."

(१०) स्वकीयांनी इंग्रजांना केलेली मदत :-

लालूच, बक्षीस अशा अनेक प्रकारच्या आमिषांना बळी पडून अनेक देशद्रोह्यांनी आपल्या नेत्यांच्या हालचाली इंग्रजांना आगोदर कळविल्या. सैन्याची व साधनांची मौल्यवान माहिती दिली. त्यामुळे इंग्रजांचे काम सोपे झाले. तात्या टोपेसारख्या रणधुरंधर सेनापतीला या फितुरीनेच दगा दिला. विश्वासघातकी लोकांची कारस्थाने व इंग्रजां-पुढील त्यांची लाचारी उठावाच्या अपयशास कारणीभूत ठरली.

(११) इंग्रजांना अनुकूल परिस्थिती :

१८५७ च्या उठावापूर्वी क्रिमिया, इराण व चीनच्या लढायांतून इंग्रज मोकळे झाले होते. त्यामुळे तेथील विशाल फौजा त्यांनी भारतात आणल्या. या फौजांनी

१८५७ चा उठाव दडपून टाकण्यास हातभार लावला.

(१२) इंग्रजांचा दहशतवाद :-

ब्रिटिशांनी उठाव दडपण्यासाठी व पुन्हा असा उठाव होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार केले. हिंदी लोकांत दहशत निर्माण व्हावी व उठावापासून जनता दूर व्हावी म्हणून इंग्रजांनी सैनिकांना फासावर चढविले. हत्यारांचा कायदा करून सर्व हिंदी लोकांना नि:शस्त्र केले. संशयावरून अनेकांच्या कत्तली केल्या. संशयितांना झाडाला उलटे टांगणे, मरेपर्यंत फटके मारणे, जिवंत जाळणे व जनावराप्रमाणे डामणे इत्यादी प्रकार करून इंग्रज राजवटीविरुद्ध उठाव करणाऱ्यास काय शासन मिळते याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यामुळे सर्वसामान्य जनता भयभीत होऊन उठावापासून दूर राहिली. परिणामी, इंग्रजांना हा उठाव दडपून टाकता आला.

(१३) दक्षिण भारतात शांतता :-

उठावापासून दक्षिण भारत शांत होता. जो थोडाफार उठाव झाले ते इंग्रजांनी ताबडतोब दडपून टाकले. उत्तरेच्या तुलनेने दक्षिणेत संघर्षाचे प्रमाण अत्यल्प होते. नरगुंद संस्थान, कोल्हापूर, सातारा, नाशिक, या प्रांतात उठाव कमी प्रमाणात झाला. तात्या टोपेचा पराजय झाल्यावर आपल्याला मदत मिळेल म्हणून तो नागपूर, बडोद्याकडे गेला. परंतु त्याला कोणीही मदत केली नाही.

वरील कारणांमुळे १८५७ च्या उठावात भारतीयांना अपयश आले.

7/10

DATE 27/7/19

Name :- Omkar Sachin Paikhande
Rauno :- C5187
Subject :- History (1857 च्या उठावामध्ये भारतीयांच्या अपयशाची कारणे स्पष्ट करा)
Class :- B.A-II (Sem-III)

प्रश्न 1857 च्या उठावामध्ये भारतीयांच्या अपयशाची कारणे स्पष्ट करा.

-> 1) उठावाचे मर्यादित क्षेत्र !-

1857 चा उठाव देशव्यापी होऊ शकला नाही. देशाच्या काही भागापुरता उठाव मर्यादित राहिला. देशातील 1/6 भूभागातच फक्त उठाव झाला. 1/10 जनताच सहभागी झाली दक्षिण भारत शांत होते क्रांतीअगोदर आठ वर्षे खालसा केलेला पंजाब शांत होता. पतियाळा, नाभा इत्यादी शीख संस्थानिकांनी तटस्थ न राहता उलट इंग्रजांना मदत केली पंजाब मधील शीख इंग्रजनिष्ठ राहिले मध्य व पूर्व बंगाल शांत राहिला होता पंजाब, सिंध, ~~राजस्थान, काश्मीर~~, नेपाळ, महाराष्ट्र, म्हैसूर मद्रास, गुजरात इत्यादी भागात उठाव नव्हता, त्यातील काही भागात किरकोळ स्वरूपाचा उठाव झाला. पंजाबी शीख, गुरखे, निजाम इत्यादींनी इंग्रजांनाच पाठिंबा दिला. थोडक्यात उठावाचे स्वरूप मर्यादित क्षेत्रापुरतेच राहिल्याने हा उठाव इंग्रजांना दडपून टाकता आला.

2) लोकक्रांती नव्हती !-

सर्व लोकांनी एकत्र येऊन लोक उठाव किंवा लोकक्रांती घडून आली नाही. ज्यांच्या जमिनी, जहागिऱ्या वतने जप्त झाली अशा दुखावलेल्या लोकांनीच उठावात हिरिरीने भाग घेतला काही देशी संस्थानिकांनी इंग्रजांना मदत करून देशद्रोह केला. शिंदे, निजाम, शीख, रजपूत राजांनीही या अटीतटीच्या प्रसंगी येथे इंग्रजी राज्य टिकवण्यासाठी इंग्रजांची मदत केली. अवधमध्ये जर ऐन वेळी गुरखा फौजांची मदत मिळाली नसती तर इंग्रजांची स्थिती अत्यंत शोचनीय झाली असती शिंदे, होळकर, हैद्राबाद, पतियाळा, जिंद कपूरथाला इत्यादी भागाचे संस्थानिक इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले. इतकेच नव्हे तर त्यातील काहींनी इंग्रजांना

प्रत्यक्ष मदतही केली.

४) उठाव ठरल्या वेळी झाला नाही !-

३१ मे १८५७ ही उठावाची तारीख ठरलेली होती. उठावाची केंद्र व लष्करी छावण्यांना छावणीतील तसे कळविण्यात आले होते. परंतु बराकपुर व मेरठच्या छावणीतील आकस्मिक घटना व काडतुस प्रकरणामुळे अतिउत्साही सैनिकांनी बंडाचा झेंडा ठरलेल्या तारखेच्या आधीच उभारला. उठावाची पूर्व तयारी होण्याआधीच तिचा स्फोट झाला. अपरिपक्व व अपुऱ्या तयारीचा फायदा नेहमीच शत्रु पक्षाला मिळत असतो. तसा तो इंग्रजांना मिळाला त्यामुळे इंग्रज सावध झाले त्यांना वेगवेगळ्या ठिकाणचे वेगवेगळ्या वेळी झालेले उठाव दडपून टाकता आले. तसेच त्यांनी संशयित बंडखोर सैनिकांची शस्त्रे काढून घेतली व इतर ठिकाणाहुन सैन्य बोलावून ठिकठिकाणी पसरलेल्या उठावाच योजनाबद्धरीतीने पराभव केला.

५) रेल्वे व दळणवळणाची साधने !-

ब्रिटीशांनी साम्राज्यविस्तार करीत असताना भारतात विविध सुधारणा केल्या डलहौसीच्या काळात रेल्वे, डाक, तार इत्यादींची निर्मीती झाली होती. त्यामुळे इंग्रजांचे सैन्य एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी सहज जाऊ शकत होते क्रांतीकारकांनी रेल्वेमार्ग विस्कळीत केल्यानंतर टपाल व तार विभागाने एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी सुचना भराभर पाठविल्या त्यामुळे इंग्रजांना भारतीयांच्या पराभव करता आला.

६) इंग्रजांकडे असणारी आधुनिक शस्त्रास्त्रे व साधनसामग्री !-

ब्रिटीशांच्या तुलनेने भारतीयांच्याकडे जुनाट शस्त्रास्त्रे होती. तोफा, दारुगोळा लुटून, युद्ध सुरु केले होते परंतु मिळालेल्या मर्यादित साधनावरच त्यांना अवलंबून राहावे लागले नियमीत पणे शस्त्रास्त्रे व दारुगोळा यांचा पुरवठा होईल यासाठी आवश्यक असणारे कारखाने त्यांच्या ताब्यात नव्हते. क्रांतीकारकांकडील दारुगोळा व शस्त्रास्त्रे संपल्यानंतर ढाल व तलवार या जुन्या हत्यारातील त्यांना लढावे लागले. त्यामुळे सैन्य-बळ भरपूर असूनही क्रांतिकारक ब्रिटिश सैन्यपुढे

DATE / /

टिकाव धरू शकले नाहीत या उलट इंग्रजांच्याकडे आधुनिक स्वरूपाची शस्त्रास्त्रे होती त्यांना इंग्लंडमधून शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांचा भरपूर पुरवठा झाला. त्यामुळे भारतीयांचा पराभव झाला.

6) इंग्रजांचे श्रेष्ठ व कर्तबगार सेनानी :-

ब्रिटिशांच्याकडे एकापेक्षा एक असे कर्तबगार व श्रेष्ठ सेनानी होते नील, हॅवलॉक, लॉरेन्स बंधू, कॅम्पबेल व सर ह्युम रोम इत्यादी मुत्सद्दी सेनापती इंग्रजांच्याकडून रणांगणात उतरले होते उत्कृष्ट व्यक्तीमत्व असलेले परिस्थितीवर नियंत्रण ठेवणारे, एकमेकांच्या मदतीस धावून जाणारे नेते ब्रिटिशांच्या बाजूला होते त्यांनी स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता ब्रिटिश साम्राज्य सुरक्षित ठेवले.

7) नेतृत्वाचा अभाव :-

ब्रिटिशांच्या तुलनेने हिंदी लोकांचे नेतृत्व कमी पडले बहादूरशहाने नेतृत्व सांभाळण्याचा प्रयत्न केला परंतु तो वृद्ध होता राणी लक्ष्मीबाई शूर व धाडसी होती परंतु तिला युद्धाचा अनुभव नव्हता नानासाहेब व तात्या टोपे हे दोघेही दक्षिणेतून आले असल्याने उत्तरेतील क्रांतीकारकांच्यावर त्यांना पुर्णपणे आपली छाप पाडता आली नाही ते नेतृत्वात कमी पडले हजरत महल व झीनत महल या स्त्रीया कुशल संघटक होत्या परंतु झाशीच्या राणीप्रमाणे गावा सोडून त्या कधीच बाहेर आल्या नाहीत उठावातील नेत्यातील अनेकांचे जीवन सुखात गेले होते क्रांतीकारकांना भोगावे लागणारे कष्ट, हाल व अडीअडचणींची या नेत्यांना कल्पना नव्हती, लष्करी दृष्ट्या हे नेतृत्व कुमकुवत ठरले.

8) उठाव करणाऱ्यांच्या बेशिस्त व लुटालूट :-

बंडवाल्यांनी दिल्ली ताब्यात घेतली परंतु त्यांच्यात कोणत्याही प्रकारची उपाययोजना नव्हती. सुरुवातीला उठाव यशस्वी झाल्यानंतर त्यांच्यात स्वातंत्र्याचे वारे संचारले ते बेशिस्त बनले त्यांच्याकडे पुरेसा पैसा नव्हता तो प्राप्त करण्यासाठी त्यांनी नागरिकांना लुटण्यास सुरुवात केली ते जमीनदार सावकार व

कँगारदार यांच्याकडे वळले व त्यांनी त्यांच्यापासून मिळकती हिसकावण्यास सुरुवात केली. बंडखोरांनी केलेली लूटलूट जाळपोळ व कत्तली इत्यादी प्रकार पाहून वरिष्ठ वर्गाला बंडाच्या अपयशापेक्षा विजयाची भीती जास्त वाटू लागली होती. कानपूरच्या लुटीत वाटणीसाठी आपसात भांडणे सुरु झाली. बंडवाले ज्या शहरात प्रवेश करीत तेथील खजिन्याच्या लुटीबरोबरच तुरुंगातील कैद्यांनाही ते मुक्त करीत. त्यात गुंड व समाजकंटकही सामील होत असत. या लोकांनी क्रांतीमुळे निर्माण झालेल्या अव्यवस्थेचा चांगलाच फायदा उचलला. त्यामुळे जनता उठाव करण्याबद्दल साशंक व उदासीन झाली व पुढे तिने त्यांना मदत देणे बंद केले.

९) इंग्रजांना अनुकूल परिस्थिती !-

1857 च्या उठावापूर्वी क्रिमिया इराण व चीनच्या लढयांतून इंग्रज मोकळे झाले होते. त्यामुळे तेथील विशाल फौजा त्यांनी भारतात आणल्या. या फौजांनी 1857 चा उठाव दडपून टाकण्यास हातभार लावला. याशिवाय, सन 1857 मध्ये भारताव्यतिरिक्त ब्रिटिश साम्राज्यात पूर्णपणे शांतता होती. त्यामुळे इंग्रजांना हा उठाव दडपून टाकण्यासाठी आपले लक्ष केंद्रीत करता आले.

१०) इंग्रजांचा दहशतवाद !-

ब्रिटिशांनी उठाव दडपण्यासाठी व पुन्हा असा उठाव होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार केले. हिंदी लोकांत दहशत निर्माण व्हावी व उठावापासून जनता दूर व्हावी म्हणून इंग्रजांनी अनेकांना फासावर चढविले. हत्याराचा कायदा करुन सर्व हिंदी लोकांना नि:शस्त्र केले. संशयावरुन अनेकांच्या कत्तली केल्या. संशयितांना झाडाला टांगणे, मरेपर्यंत फटके मारणे, जिवंत जाळणे व जनावरा प्रमाणे वागणे इत्यादि प्रकार करण्यात इंग्रज राजवटी विरुध्द उठाव करण्यास काय शासन मिळते याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यामुळे सर्वसामान्य जनता भयभीत होऊन उठावापासून दूर राहिली. परिणामी, इंग्रजांना हा उठाव दडपून टाकता आला.

Page No.
Date 27 7 19

नाव - कोळी ऋतीक राजेंद्र
वर्ग - बी. ए. भाग २ रोल नं - 5138
विषय - इतिहास

प्रश्न :- 1857 च्या उठावामध्ये भारतीयांच्या अपयशाची कारणे स्पष्ट करा?

→ 1] उठावाचे मर्यादित क्षेत्र :-

1857 चा उठाव देशव्यापी होऊ शकला नाही. देशाच्या काही भागापुरता उठाव मर्यादित राहिला. देशातील 1/6 भूभागातच फक्त उठाव झाला. 1/10 जनताच सहभागी झाली. दक्षिण भारत शांत होता. क्रांतीपूर्वीदर आठ वर्षे खालसा केलेला पंजाब शांत होता. पतियाळा नाभा इ. शीख संस्थानिकांनी तटस्थ न राहता उलट इंग्रजांना मदत केली. पंजाब मधील शीख इंग्रजनिष्ठ राहिले. मध्य व पूर्व बंगाल शांत राहिला होता. पंजाब, सिंध, राजस्थान, काश्मीर, नेपाळ, महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास गुजरात इ. भागात उठाव नव्हता. त्यातील काही भागात किरकोळ स्वरूपाचा उठाव झाला. पंजाबी, शीख, गुरखे, निजाम इ. इंग्रजांनाच पाठिंबा दिला. थोडक्यात उठावाचे स्वरूप मर्यादित क्षेत्रापुरतेच राहिल्याने हा उठाव इंग्रजांना दडपून टाकता आला.

2] लोकक्रांती नव्हती :-

सर्व लोकांनी एकत्र येऊन लोक उठाव किंवा लोकक्रांती घडून आली नाही. ज्यांच्या जमिनी, जहागिऱ्या वतने जप्त झाले अशा दुखावलेल्या लोकांनीच उठावात हिरिरीने भाग घेतला. काही देशी संस्थानिकांनी इंग्रजांच्या देशद्रोह केला. शिंदे, निजाम, शीख रजपूत यांच्या प्रसंगी येथे इंग्रजी राज्य टिकवण्यासाठी इंग्रजांची मदत केली. अवधामध्ये जर सेन बेळी गुरख्या फौजांची मदत मिळाली नसती तर इंग्रजांची स्थिती अत्यंत शोचनीय झाली असती. शिंदे, होळकर, हैद्राबाद, पतियाळा, जिंद कपुरथला इ. भागाचे संस्थानिक इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले इतकेच

नव्हे तर त्यातील कालींनी इंग्रजांना प्रत्यक्ष मदतही केली.

3] उठाव ठरल्या वेळी झाला नाही ! -

31 मे 1857 ही उठावाची तारीख ठरलेली होती उठावाची केंद्र व लष्करी छावण्यांना तसे कळविण्यात आले होते. परंतु बराकपुर व मेरठच्या छावणीतील आकस्मित घटना व काडतुस प्रकरणामुळे अतिउत्साही सैनिकांनी बंडाच्या झेंडा ठरलेल्या तारखेच्या अगोदरच उभारला उठावाची पूर्ण तयारी होण्याअधीच तिचा स्फोट झाला. अपरिपक्व व अपुऱ्या तयारीचा फायदा नेहमीच शत्रु पक्षाला मिळत असतो. तसा तो इंग्रजांना मिळाला त्यामुळे इंग्रज सावध झाले त्यांना वेगवेगळ्या ठिकाणचे वेगवेगळ्या वेळी झालेली उठाव दडपून टाकता आले. तसेच त्यांनी संशयित बंडखोर सैनिकांची शस्त्रास्त्रे काढून घेतली व इतर ठिकाणाहून सैन्य बोलावून ठिकठिकाणी पसरलेल्या उठावाच्या योजना बद्धरीतीने पाडाव केला.

4] रेल्वे व दळणवळणाची साधने.

ब्रिटीशांनी साम्राज्यविस्तार करीत असताना भारतात विविध सुधारणा केल्या डलहौसीच्या काळात रेल्वे, डाक, तार इ. निर्मीती झाली होती त्यामुळे इंग्रजांचे सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज जाऊ शकत होते. क्रांती-कारकांनी रेल्वेमार्ग विस्कळित केल्यानंतर टपाल व तार विभागाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुचना भराभर पाठविल्या त्यामुळे इंग्रजांना भारतीयांच्या पराभव करता आला.

5] इंग्रजांकडे असणारी आधुनिक शस्त्रास्त्रे व साधन सामग्री.

ब्रिटीशांच्या तुलनेत भारतीयांच्याकडे जुनाट शस्त्रास्त्रे होती. तोफा, दारुगोळा लुटून युद्ध सुरु केले होते. परंतु मिळालेल्या मर्यादित साधनांवरच त्यांना अवलंबून रहावे लागले. नियमित पणे शस्त्रास्त्रे व दारुगोळा व यांचा पुरवठा होईल यासाठी आवश्यक असणारे कारखाने व त्यांच्या ताब्यात नव्हते. क्रांतीकारकाकडील दारुगोळा व शस्त्रास्त्रे संपल्यानंतर ढाल व तलवार या जुन्या हत्यारांनीच त्यांना लढावे लागले. त्यामुळे सैन्यबळ भरपूर असुनही क्रांतिकारक ब्रिटिश सैन्यापुढे टिकाव धरु

शकले. या उलट इंग्रजांच्याकडे आधुनिक स्वरूपाची शस्त्रास्त्रे होती त्यांना इंग्लंडमधून शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांचा भरभून पुरवठा झाला. त्यामुळे भारतीयांचा पराभव झाला.

6) इंग्रजांचे श्रेष्ठ व कर्तबगार सेनानी :-

ब्रिटिशांच्याकडे एकापेक्षा एक असे कर्तबगार व श्रेष्ठ सेनानी होते. नील, हॅवलॉक, औट्रॅम, लॉरेन्स बंधू, कॅम्पबेल व सर ह्युम रोज इ. मुत्सद्दी सेनापती इंग्रजांच्या कडून रणांगणात उतरले होते. उत्कृष्ट व्यक्तीमत्व असलेल्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणारे, एकमेकांच्या मदतीस धावून जाणारे नेते ब्रिटीशांच्या बाजुला होते. त्यांनी स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता ब्रिटीश साम्राज्य सुरक्षित ठेवले.

7] नेतृत्वाचा अभाव :-

ब्रिटीशांच्या तुलनेने हिंदी लोकांचे नेतृत्व कमी पडले. बहादूरशहाने नेतृत्व टाळण्याचा प्रयत्न केला. त्याशिवाय तो वृद्ध होता. राणी लक्ष्मीबाई शूर व धाडसी होती परंतु तिला युद्धाचा अनुभव नव्हता. नानासाहेब व त्या टोपे हे दोघेही दक्षिणेतून आले असल्याने उत्तरे तील क्रांतीकारकांच्यावर त्यांना पूर्णपणे आपली छाप पाडता आला नाही. ते नेतृत्वात कमी पडले. बेगम हजरत महल व झीनत महल या स्त्रीया कुशल संघटक होत्या. परंतु झाशीच्या राणीप्रमाणे बोवा सोडून त्या कधीच बाहेर आल्या नाहीत. उठावातील नेत्यांतील अनेकांचे जीवन सुखात गेले होते. क्रांतीकारकांना भोगावे लागणारे कष्ट, हाल व अडीअडचणींची या नेत्यांना कल्पना नव्हती लष्करी दृष्ट्या हे नेतृत्व कुमकुवत ठरले.

8] उठाव करणाऱ्यांच्यात बेशिस्त व लुटालुट :-

बंडवाल्यांनी दिल्ली ताब्यात घेतली परंतु त्यांच्यात कोणत्याही प्रकारची उपाय योजना नव्हती. सुरवातीला उठाव यशस्वी झाल्यानंतर त्यांच्यात स्वातंत्र्याचे वारे संचारले. ते बेशिस्त बनले. यांच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. तो उठाव करण्यासाठी त्यांनी नागरिकांना लुटण्यास सुरवात केली ते जमीनदार सावकार व कंत्राटदार यांच्याकडे वळले व त्यांनी त्यांच्यापासून मिळकती हिसकावण्यात सुरूवात केली. बंडखोरांनी केलेली लाळूट

जाळपोळ व कत्तली इ प्रकार पाहून वरिष्ठ वर्गाला बंडाच्या अपयशापेक्षा विजयाची भीती जास्त वाटू लागली होती. कानपूरच्या लुटीत वाटणीसाठी आपसात भांडणे सुरु झाली. बंडवाले ज्या शहरात प्रवेश करीत तेथील खजिन्याच्या लुटीबरोबरच तुरुंगातील कैद्यांनाही ते मुक्त करीत त्यात गुंड व समाजकंटकही स्वतंत्र होत असत या लोकांनी क्रांतीमुळे निर्माण झालेल्या अव्यवस्थेचा चांगला फायदा उचलला त्यामुळे जनता उठाव करणाऱ्यांबद्दल साशंक व उदासीन झाली व पुढे तिने त्यांना मदत देणे बंद केले.

९) इंग्रजांना अनुकूल परिस्थिती :-

१८५७ च्या उठावापूर्वी क्रिमिया, इराण व चीनला लढायांतून इंग्रज मोकळे झाले होते. त्यामुळे तेथील विशाल फौजा त्यांनी भारतात आणल्या. या फौजांनी १८५७ चा उठाव दडपून टाकण्यास हातभार लावला. थोडक्यात सन १८५७ मध्ये भारतव्यतिरिक्त ब्रिटीश साम्राज्यात पूर्णपणे शांतता होती त्यामुळे इंग्रजांना हा उठाव दडपून टाकण्यासाठी आपले लक्ष केंद्रित करता आले.

१०) इंग्रजांचा दहशतवाद :-

ब्रिटीशांनी उठाव दडपण्यासाठी व पुन्हा असा उठाव होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार केले. हिंदी लोकांविषयी दहशत निर्माण व्हावी व उठावापासून जनता दूर व्हावी म्हणून इंग्रजांनी अनेकांना फासावर चढविले. हत्यारांचा कायदा करुन सर्व हिंदी लोकांना नि:शस्त्र केले. झाडाला उलटे टांगणे, मरेपर्यंत फटके मारणे, जिवंत जाळणे व जनावराप्रमाणे डागणे, मरेपर्यंत फटके इ प्रकार करुन इंग्रज राजवटीविरुद्ध उठाव करणाऱ्यास काय शासन मिळते याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यामुळे सर्वसामान्य जनता भयभीत होऊन उठावापासून दूर राहीली. परिणामी, इंग्रजांना हा उठाव दडपून टाकण्यास आला.

GoodLuck Page No.
Date 27 / 7 /2019

प्रश्न - नाव : कोळी सुरज विजय
वर्ग :- बी. ए. भाग २ रोल नं. - 5139.
विषय :- इतिहास.
१८५७ च्या उठावामध्ये भारतीयांच्या अपयशाची कारणे स्पष्ट करा.

प्रश्न 1857 मध्ये उठावामध्ये 'भारतीयांच्या' अपयशाची कारणे स्पष्ट करा.

① उठावाचे मर्यादित क्षेत्र

1857 चा उठाव मर्यादित पद्धतीने देशातील ११६ भूभागातच फक्त उठाव झाला ३/१० जनताच सहभागी झाली. दक्षिण भारत शांत होता. क्रांती अगोदर ७ वर्षे खालसा केलेला पंजाब शांत होता. पतियाळा नाभा इ. शीख संस्थानिकांनी तटस्थ न राहता उलट इंग्रजांना मदत केली पंजाबमधील शीख इंग्रजनिष्ठ राहिले. मध्य व पूर्व बंगाल शांत राहिला होता. पंजाब, सिंध, राजस्थान, काश्मीर नेपाळ, महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, गुजरात इ. भागात उठाव नव्हता यातील काही भागात किरकोळ स्वरूपाचा उठाव झाला. पंजाबी शीख गुरखे, निजाम इत्यादिंनी इंग्रजांना पाठिंबा दिला. थोडक्यात उठावाचे स्वरूप मर्यादित क्षेत्रापुरतेच राहिल्याने हा उठाव इंग्रजांना दडपून टाकता आला.

② लोकक्रांती नव्हती :

सर्व लोकांनी भाग घेऊन लोक उठाव किंवा लोकक्रांती घडून आली नाही ज्यांच्या जमिनी, जहागिरी, वतने जप्त झाली अशा दुखावलेल्या लोकांनीच उठावात हिरीरीने भाग घेतला काही देशी संस्थानिकांनी इंग्रजांना मदत करून देशद्रोह केला शिंदे, निजाम, शिख, रजपूत राजानांही या अहितरी च्या पूर्वमी गेले इंग्रजी राज्य टिकवण्यासाठी इंग्रजांची मदत केली अशा मध्ये जेव्हा वेळी जर गुरखा, फौजांची मदत मिळाली नसती तर इंग्रजांची स्थिती अंतत शोचनीय झाली असती. शिंदे, होळकर, हैदराबाद, पतियाळा, जींद, कपुरथला इ. भागांचे संस्थानीक इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले इतकेच नव्हे तर यातील काहींनी इंग्रजांना प्रत्यक्ष मदत केली

३१ मे १८५७ ही उठावाची तारीख ठरलेली होती उठावाची केंद्र व लष्करी छावण्यांना तसे कळविण्यात आले होते परंतु बराकपूर व मेरठच्या छावणीतील आकस्मीक घटना व काडतुस प्रकरणामुळे अतीउत्साही सैनिकांनी बंडाच्या

(86) Goodluck

GoodLuck Page No.
Date

होणे ठरलेल्या तारखेच्या अगोदरच उभारला. उठावाची पूर्ण तयारी होण्याआधीच त्याचा स्फोट झाला. अपरिपक्व व अपुऱ्या तयारीचा फायदा नेहमीच शत्रु पक्षाला मिळत असतो. तसा तो इंग्रजांना मिळाला. यामुळे इंग्रज सावध झाले. त्यांना वेगवेगळ्या भागांचे वेगवेगळे झालेले उठाव दडपून टाकता आले. तसेच त्यांनी संशयित बंडखोर सैनिकांची शस्त्रास्त्रे काढून घेतले व इतर ठिकाणाहून सैन्य बोलावून ठिकठिकाणी पसरलेल्या उठावांचा योजनाबद्धरीतीने पराभव केला. (४)

* (४) रेल्वे व दळणवळणाची साधने

ब्रिटिशांनी साम्राज्य विस्तार करीत असताना भारतात विविध सुधारणा केल्या. डलहौसीच्या काळात रेल्वे, डाक, तार, इ. निर्मिती झाली होती. यामुळे इंग्रजांचे सैन्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज जाऊ शकत होते. क्रांतिकारकांनी रेल्वेमार्ग विस्कळीत केल्यानंतर टपाल व तार विभागाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सूचना भराभर पाठविल्या. यामुळे इंग्रजांना भारतीयांचा पराभव करता आला.

* (५) इंग्रजांकडे असणारी आधुनिक शस्त्रास्त्रे व साधन सामग्री :

ब्रिटिशांच्या तुलनेने भारतीयांकडे जुनाट शस्त्रास्त्रे होती. तोफा, दारुगोळा, लुटून युद्ध सुरु केले होते. परंतु मिळालेल्या मर्यादित साधनांवरच त्यांना अवलंबून रहावे लागले. नियमितपणे शस्त्रास्त्रे व दारुगोळा यांचा पुरवठा होईल यासाठी आवश्यक असणारे कारखाने यांच्या ताब्यात नव्हते. क्रांतिकारकांकडील दारुगोळा व शस्त्रे संपल्यानंतर ढाल व तलवार या जुन्या हत्यारानीच त्यांना लढावे लागले. यामुळे सैन्यबळ भरपूर असूनही क्रांतिकारक ब्रिटिश सैन्यापुढे टिकाव धरु शकले नाहीत. याउलट इंग्रजांकडे आधुनिक स्वरुपाची शस्त्रे होती. त्यांना इंग्लंडमधून शस्त्रास्त्रे व दारुगोळा यांचा भरपूर पुरवठा झाला. यामुळे भारतीयांचा पराभव झाला.

(६) इंग्रजांचे श्रेष्ठ कर्तबगार सेनानी :

ब्रिटिशांच्याकडे एकापेक्षा एक असे कर्तबगार व श्रेष्ठ सेनानी होते. नील, हॅवलॉक, आउट्रम, लॉरेन्स, हेन्री कॅम्पबेल व सर ह्यू रोज इ. मुत्सद्दी सेनापती इंग्लंडमधून रणांगणात उतरले होते. उत्कृष्ट अस्तित्व असलेले परिस्थितीवर नियंत्रण ठेवणारे अधिकाऱ्यांच्या मदतीस धावून जाणारे नेते ब्रिटिशांच्या बाजूला होते. त्यांनी स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता ब्रिटिश साम्राज्य सुरक्षित ठेवले.

GoodLuck Page No. Date

★ ⑦ नेतृत्वाचा अभाव :

ब्रिटीशांच्या तुलनेत हिंदी लोकांचे नेतृत्व कमी पडले बहादुरशहाने नेतृत्व टाकण्याचा प्रयत्न केला शाबीवाय तो वृद्ध होता. राणी लक्ष्मी बाई शूर व धाडसी होते. परंतु तिला युद्धांचा अनुभव नव्हता. नानासाहेब व तात्या टोपे हे दोघेही पश्चिमेतुन आले असल्याने उत्तरेकडील क्रांतीकारकांवर यांना पुरेपुर आपली छाप पाडली आली नाही. ते नेतृत्वात कमी पडले इतरत्र महल बेगम व बख्तीनन महल या स्त्रीया कुशल संघटन होत्या परंतु झाशीच्या राणीप्रमाणे त्यांना ओढुन या कधीच बाहेर आल्या नाही. कळातील मेस्तीतील अनेकांचे जीवन सुखात गेले होते क्रांतीकारकांना भोगावे लागणारे कष्ट, हाल व अडीअडचणींच्या या नेत्यांना कळला नव्हती. लष्करी दृष्ट्या हे नेतृत्व कमकुवत ठरले.

★ ⑧ उठाव करणाऱ्यांच्यात बेशीस्त व लुटालुट :

बंडवाल्यांनी दिल्ली ताब्यात घेतली परंतु त्यांच्या कोणताही प्रकारची उपाय योजना नव्हती. सुरुवातीला उठाव यशस्वी झाल्यानंतर त्यांच्यात स्वातंत्र्याचे वारे संचारले. ते बेशीस्त बनले. त्यांच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. तो संपल्यानंतर खर्चासाठी यांनी नागरीकांनी लुटण्यास सुरुवात केली ते जमीनदार सावकार व व्यापारी यांच्याकडे वळले व यांनी त्यांच्या पासुन मिळकती हिसकावण्यास सुरुवात केली, बंडखोरांनी केलेली लुटालुट जाळपोळ व कत्तली इ. प्रकार पाहून वरीष्ठ वर्गाला बंडाच्या अपयशापेक्षा विजयाची भीती जास्त वाटू लागली होती कानपुरच्या लुटीत वाटणीसाठी आपसात भांडणे सुरू झाली बंडावले ज्या राज्यात प्रवेश करीत तेथील खजीन्याची लुटी बरोबरच तुरुंगातील कैद्यानाही ते मुक्त करीत. भाम गुंडी व समाजकंटकही स्वतंत्र होत असत. या लोकांनी क्रांतीमुळे निर्माण झालेल्या अव्यवस्थेच्या चांगला फायदा उचलला. यामुळे जनता उठाव करणाऱ्याबद्दल संशक व उदासीन झाली व पुढे तिने यांना मदत देणे बंद केले.

★ ⑨ इंग्रजांना अनुकुल परिस्थीती

१८५६ च्या उठावापुर्वी क्रिमीया. इराण व चीनच्या लढायांतुन इंग्रज मोकळे झाले होते यामुळे तेथील विशाल फौजा यांनी आयत्या आणल्या. या फौजांनी १८५७ चा उठाव चडपुन टाकण्यास हातभार लावला. योगायोगाने सन १८५७ मध्ये

भारतातील ब्रिटीश साम्राज्य पूर्णपणे धोक्यात होते त्यामुळे इंग्रजांना हा उठाव दडपुन टाकण्यासाठी आपले लक्ष केंद्रीत करणे आले

(16) इंग्रजांचा दहशतवाद :-

ब्रिटिशांनी उठाव दडपण्यासाठी व पुन्हा असा उठाव होऊ नये म्हणुन मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. हिंदी लोकांत दहशत निर्माण करणे व उठावापासुन जनता दूर रहावी म्हणुन इंग्रजांनी अनेकांना फासावर चढवील. शस्त्रांचा कायदा करून सर्व हिंदी लोकांना निःशस्त्र केले संशयावरून अनेकांच्या कत्तली केल्या संशयितांना झाडाला उलटे टांगले. मरेपर्यंत फटके मारणे, जिवंत जाळणे व जनावराप्रमाणे डागणे इत्यादी प्रकार करून इंग्रज राजवटी विरुद्ध उठाव करणाऱ्यांना काय शासन मिळते, याचे प्रात्यक्षिक करून दाखविले त्यामुळे सर्वसामान्य जनता भयभीत होऊन उठावापासुन दूर राहीली. परिणामी इंग्रजांना हा उठाव दडपुन टाकता आला

7/10

Name :- Rutika Vasant Redekar
class :- B.A II
Roll No :- 5256 Subject :- History

Date : 27/7/19
Page No.:

प्र १ ला] 1857 च्या उठावाची कारणे

→ 1857 च्या उठावाची कारणे पुढील प्रमाणे:

१] राजकीय कारणे → ① इंग्रजांचे साम्राज्यवादी धोरण व भेदनीती इ.स 1757 च्या प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना झाली पुढील वर्षात ईस्ट इंडिया कंपनीने साम्राज्यवादी धोरणाचा अंगीकार करून सारा हिंदुस्थान पादाक्रांत केला. आपले साम्राज्य उभे करताना ब्रिटिशांनी 'फोडा व झोडा' या तत्वाचा नेहमीच अवलंब केला ब्रिटिशांची भेदनीती, त्यांचा व्यापारी साम्राज्यवाद त्यांची शस्त्रास्त्रे व संस्कृतीचे सामर्थ्य यांचे महत्त्व अनेक हिंदी राजे समजून आले नाही आपापसातील हेवेदावे स्वार्थासाठी यामुळे त्यांचा त्यास अपयशाने झाला.

② तैनाती फौजेच्या पद्धतीचा दुष्परिणाम → लॉर्ड वेलस्लीने भारतातील साम्राज्यवादी तैनाती फौजेच्या पद्धत अमलात आणली. ~~अनेक संस्थानिक व नवाबांना~~ तैनाती फौज ठेवण्यासाठी सक्ती केली. या फौजेचा खर्च संस्थानिक व देशी राजांना करावा लागे. या मोबदल्यात सैन्य त्यांचे अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षण करणार होते.
या पद्धतीमुळे इंग्रज सैन्याचा खर्च परस्पर निघाला आणि त्यांच्या साम्राज्यविस्तार ही मदत झाली. वेलस्लीने निजाम, मराठ्यांचे, शिंदे, भोसले, होळकर इत्यादी सरदार, अयोध्येचा नबाब, पेशवा दुसरा बाजीराव इ. तैनाती फौज स्वीकारावयास भाग पडले.

③ लॉर्ड डलहौसीचे आक्रमक साम्राज्यवादी धोरण → लॉर्ड डलहौसीने साम्राज्यवादी धोरण स्वीकारून हिंदुस्थानातील स्थानिक राज्ये खालसा करून ब्रिटिश साम्राज्यास जोडला. 1849 साली शिखांचा पराभव करून पंजाब जिंकला. 1852 साली ब्रह्मदेशाशी युद्ध करून ब्रह्मदेश ब्रिटिश साम्राज्य जोडला. सिक्कीम व दार्जिलिंग हे पण 1856 मध्ये जोडला गेला. अवध संस्थानात अराजकता निर्माण झाल्याच्या कारणावरून

Date: / /
Page No.:

ब्रिटिश अमलाखाली आणले. राजांच्या दत्तक घेण्याला असलेले अधिकार डलहौसीने नामंजुर करून सातारा (1851) जैतपुर, संबलपुर (1850) उदयपूर (1852) नागपूर (1853) झाशी (1854) इ. संस्थाने खालसा करून ती ब्रिटिशांनी साम्राज्यात समाविष्ट केला.

(३) पदव्या व पेन्शन रद्द ⟶ गव्हर्नरजनरलांनी पदव्या व तनखे इंग्रज सरकारने दिले होते ते परंपरेप्रमाणे दत्तक पुत्र नानासाहेब पेशवा यांची पदवी रद्द केली त्यास मिळणारी वार्षिक ८ लाख रुपये पेन्शन डलहौसीने रद्द केली दुबळे करण्याचा प्रयत्न केला. कर्नाटकच्या नवाबाचे राज्य खालसा केले. इंग्रजांनी अनेक संस्थानिकांच्या पदव्या व पेन्शन रद्द केल्यामुळे त्यांची मने दुखावली गेली.

(ब) सामाजिक कारणे ⇒

① भारतीयांना अपमानास्पद वागणूक ⟶ ब्रिटिशांनी काळा गोरा असा वर्ण भेद करून ते भारतीयांना तुच्छतेची वागणूक देत असत. भारतीयांना सातत्याने अपमानित करीत असत. त्यांच्या घरातील कुत्र्या-मांजराप्रमाणे भारतीयांना वर्तणुक मिळत असे. भारतीय अशिक्षित, असंस्कृत, रानटी, मागासलेले आहेत असा त्यांच्या वर असत आरोप करून त्यांना गुलामांप्रमाणे मारहाण केली जाई. रस्त्यावरून एखादा गोरा अधिकारी जात आहे तर त्याला सलाम ठोकावा लागत होता. युरोपियनांच्या हॉटेलच्या व क्लब मध्ये भारतीयांना प्रवेश दिला जात नव्हता.

② भारतीय समाजजीवनावर प्रहार ⟶ भारतीय समाजव्यवस्थेत असलेल्या रूढी-परंपरा नष्ट करण्यासाठी व भारतीय समाज जीवनात बदल करण्यासाठी ब्रिटिशांनी

Date : / /
Page No.:

अनेक कायदे केले. सती बंदीचा कायदा. विधवा पुनर्विवाह संमती कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, कन्यावध बंदी कायदा इ. कायदे झाल्यामुळे आपला धर्म व संस्कृती बुडविण्यासाठी हे सर्व केले जात आहे. या मुळे इंग्रजांविरुद्ध द्वेषाची भावना अधिकच वाढत गेली.

③ बेकारांच्या संख्येत वाढ ⟶ इंग्रजांनी जहागिरदारांचे हक्क काढुन घेतले त्यामुळे जहागिरदारांच्याकडे असणारे लोक बेकार झाले संस्थाने बरखास्त केल्यामुळे संस्थानिकांवर अवलंबून असणारे हजार लोक बेकार झाले. भारतातुन कच्चा माल इंग्लंडला जाऊ लागला. आणि तिथील कारखान्यात तयार केलेला पक्का माल भारतीय बाजारपेठेमध्ये विकू लागला. कारखान्यात तयार होऊन मालउत्तम प्रतीचा व स्वस्त मिळत असे. या उलट भारतीय ~~कारागिरांनी तयार केलेला~~ पक्का माल खोबड खोबड व महाग मिळत असे. व्यवसाय बंद पडून लाखो लोक कारागिर बेकार झाले. मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला.

Ⓚ लष्करी कारणे ⟹

① हिंदी शिपायांवरिल बंधने ⟶ कंपनीने अनेक लष्करी कायदे पास करुन हिंदी शिपायांवर अनेक बंधने लादली शिपायांनी कपाळावर गंध न लावण्याची व दाढी करण्याची सक्ती केली. शेंडी राखु नये, लुंगी नेसु नये अशी धर्म विरोधी वाटणारी बंधने लादण्यात आली. भारतीय सैन्यात समुद्रपर्यटन केल्यास आपला धर्म बुडेल अशी समजुत होती. असे असताना भारतीय सैन्याला समुद्र पार करुन विदेशात पाठविले जाऊ लागले.

② पगार व बढतीतील तफावत ⟶ ब्रिटिश लष्करातील हिंदी शिपायांचे वेतन युरोपियन शिपायांच्या तुलनेत फारच कमी होते. एकदा हिंदी सैनिकाने सैन्यात नोकरी

तुलनेत फारच कमी होते. एकदा हिंदी सैनिकाने सैन्यात झाला साधा सैनिक म्हणूनच निवृत्त व्हावे लागे. युरोपियनांना मात्र लवकर बढती मिळत होती. हिंदी सैनिकांच्या कोणत्याही प्रकारची बढती पगारवाढ व महागाई भत्ता इ. सवलती मिळत नवत्या त्यामुळे हिंदी शिपायांत असंतोष निर्माण झाला.

③ हिंदी शिपायांना मिळणारी अपमानास्पद वागणूक → सैन्यात बहुतेक उच्च अधिकारी ब्रिटिश होते. ते हिंदी शिपायांना अपमानास्पद वागणूक देत असे. परदेश ग्राउंडवर हिंदी शिपायांना पदोपदी अपमान केला जाई. शिक्षा देऊन त्यांची मानहानी केली जाई. लष्कर मोहिमेवर हिंदी शिपायांना आघाडीवर ठिकाणी येई. अशा वेळी खूप हिंदी सैनिक मारले जात होते. परंतु विजयाची मान गोऱ्यांना मिळत असे या अन्यायकारक वागणुकीमुळे शिपायांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला.